MHST080003002013

**रे. दि. मु. क्रमांक ७३/२०१३ मधील नि. क्र. ५५ खालील आदेश.**
**किसन ठोंबरे विरुध्द रामदास माने व इतर**
**(आदेश पारित दिनांक २८.०३.२०२५)**

---

सदरचा अर्ज वादी यांनी निशाणी क्र. ५२ वरील आदेशाप्रमाणे दुरुस्ती करणेस झालेला विलंब माफ होऊन त्याप्रमाणे दुरुस्ती करणेस परवानगी मिळणेकरिता दाखल केलेला आहे.

०२. प्रस्तूत अर्जात वादी यांनी असे कथन केले आहे की, याकामी प्रतिवादी नं. १ हे मयत झाले असुन वादीने सदरील प्रतिवादीचे वारस रेकॉर्डवर घेणेचा अर्ज दिला होता. मे. न्यायालयाने सदरचा अर्ज मंजुर करुन निशाणी क्र. ५२ ला वारस रेकॉर्डवर घेणेचा आदेश दिलेला आहे. सदरील आदेशाची अंमलबजावणी अनावधानाने राहुन गेली होती. सबब, निशाणी क्र. ५२ प्रमाणे प्रतिवादी क्र. १ चे वारस रेकॉर्डवर घेणेची परवानगी मिळावी, अशी त्यांनी विनंती केलेली आहे.

०३. सदर अर्जावर प्रतिवादी यांनी आपले म्हणणे दाखल केले आहे. प्रतिवादी नुसार, वादीने प्रतिवादी क्र. १ चे वारस दोन वर्षानंतर वारस रेकॉर्डवर घेणेचा अर्ज दिला. कोर्टाचा हुकूम करुन परवानगी दिली असताना अद्याप दुरुस्ती केली नसलेने कॉस्ट करणेची त्यांनी विनंती केलेली आहे.

०४. अर्ज व त्यावरील म्हणणे याचे अवलोकन केले. निशाणी क्र. ५२ च्या

अर्जाचे अवलोकन केले असता असे लक्षात येते की, सदरचा अर्ज हा प्रतिवादी क्र. १ चे वारस रेकॉर्डवर घेऊन त्याप्रमाणे दुरुस्ती करणेकरिता दाखल केलेला होता. सदरचा अर्ज हा दिनांक ०३/११/२०२४ रोजी मंजूर झालेला आहे. सदर अर्जाप्रमाणे वादी यांनी विहीत मुदतीत दुरुस्ती केलेली नाही. दाव्याच्या गुणावगुणाव निर्णयाकरिता प्रतिवादी क्र. १ यांचे वारस रेकॉर्डवर येणे व त्यांचे म्हणणे पटलावर येणे गरजेचे आहे. मात्र वादी यांनी विहित मुदतीत दुरुस्ती न केल्याने दावा लांबणीवर पडलेला आहे. त्यामुळे त्यांचेवर कॉस्ट लावणे न्यायोचित होईल. करिता खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

## **आदेश**

| | |
|---|---|
| १. | सदरचा अर्ज रक्कम रुपये ४००/– चे कॉस्टवर मंजूर करण्यात येत आहे. |
| २. | सदरची कॉस्ट ही वादी यांनी प्रतिवादी यांना देण्यात यावी. |
| ३. | सदर आदेशाची दोन्ही पक्षकारांनी नोंद घ्यावी. |

PATTEBAHADUR KARUNA

Digitally signed by PATTEBAHADUR KARUNA
Date: 2025.04.02 15:50:14 +0530

(के. ए. पट्टेबहादुर)

दिनांकः– २८.०३.२०२५ सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, खंडाळा.